# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:20.08.2024** **वार:मंगळवार**

---

ठळक बातम्या

- मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर
- पॅरीस पॅरालिम्पिक्समध्ये सहभागी होणाऱ्या भारतीय खेळाडूंशी पंतप्रधान मोदींनी साधला संवाद
- गैरप्रकार रोखण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेकडून नव्या मार्गदर्शक सूचना जाहीर
- कोलकत्याच्या आर जे कार रुग्णालयातल्या आर्थिक गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी सरकारकडून विशेष तपास पथक स्थापन आणि
- येत्या चार दिवसात देशभरात मुसळधार पावसाचा हवामान विभागाचा अंदाज

मलेशिया पंतप्रधान दौरा

मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम सध्या तीन दिवसीय भारत दौऱ्यावर असून ते आज नवी दिल्ली इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतील. या भेटीदरम्यान दोन्ही देशांमध्ये अनेक करारांवर स्वाक्षरी होण्याची शक्यता आहे. या भेटीनंतर मोदी यांच्या वतीने स्नेहभोजनाचं आयोजन करण्यात आलं आहे. त्यानंतर इब्राहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांची भेट घेतील.

पॅरीस पॅरालिम्पिक्स

पॅरीस पॅरालिम्पिक्समध्ये सहभागी होणाऱ्या भारतीय खेळाडूंशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल संवाद साधला. हा प्रवास या खेळाडूंसह भारतासाठीही खूप महत्त्वाचा असल्याची भावना पंतप्रधानांनी दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून खेळाडूंशी बोलताना व्यक्त केली. तसंच 140 कोटी भारतीयांचे आशिर्वाद तुमच्यासोबत आहेत, असं सांगत त्यांना शुभेच्छाही दिल्या. पॅरालिम्पिक्ससाठी एवढ्या मोठ्या प्रमाणावर खेळाडू पाठविण्याची ही पहिलीच वेळ असल्याचं क्रीडामंत्री मनसुख मांडवीय यांनी सांगितलं. 84 खेळाडू पॅरीस पॅरालिम्पिक्समध्ये भारताचं प्रतिनिधित्व करणार असून यातील 50 टक्के खेळाडू पहिल्यांदाच पॅरालिम्पिक्समध्ये खेळत असल्याची माहितीही त्यांनी दिली.

भारत जपान संवाद

भारत आणि जपानच्या मंत्र्यांमध्ये आज नवी दिल्लीत संवाद होणार आहे. भारताकडून संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि परराष्ट्र व्यवहारमंत्री एस जयशंकर तर जपानचे संरक्षणमंत्री किहारा मीनोरू आणि परराष्ट्र व्यवहारमंत्री योको कामिकावा या संवादात सहभागी होतील. या अंतर्गत आयोजित द्विपक्षीय बैठकीत दोन्ही देशांमधील संबंध अधिक बळकट करण्यासाठीच्या नव्या उपक्रमांविषयी चर्चा होईल आणि द्विपक्षीय सहकार्याचाही आढावा घेतला जाईल. भारत आणि जपानशी संबंधित धार्मिक आणि जागतिक प्रश्नांवरही या बैठकीत चर्चा होईल. या बैठकीमुळे धोरणात्मक आणि जागतिक भागीदारी अधिक बळकट होईल आणि संरक्षण सहकार्यामध्येही सुधारणा होतील, अशी आशा भारतीय परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने व्यक्त केली आहे. दुसरा मंत्रीस्तरीय संवाद सप्टेंबर महिन्यात जपानमध्ये होणार आहे.

सीतारमण

केंद्रीय अर्थ आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली काल नवी दिल्ली इथं सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या कामगिरीचा आढावा घेण्यासाठी बैठक झाली. आर्थिक मापदंड, ठेवी जमा करणे, डिजिटल पेमेंट आणि सायबर सुरक्षा आराखडा, वित्तीय समावेशन अंतर्गत कर्ज मिळवणे आणि बँकविषयक इतर नवीन समस्यांवर या बैठकीत चर्चा करण्यात आली. आर्थिक वर्ष 2024 मध्ये, बँकांनी सर्व आर्थिक मापदंडांचा विचार करता चांगली कामगिरी केली आहे, असं या बैठकीत सांगण्यात आलं. बँकांचे कर्मचारी ग्राहकांपर्यंत विशेषत: ग्रामीण आणि निम-शहरी भागातल्या ग्राहकांपर्यंत पोहचतील याची बँकांनी खातरजमा करून घ्यावी असे आवाहन

निर्मला सीतारमण यांनी बँकांना केलं.  पंतप्रधान सौरछत मोफत वीज योजना आणि पंतप्रधान विश्वकर्मा योजना या उपक्रमांतर्गत पात्र लाभार्थ्यांना  कर्ज पुरवठा वाढवण्यावर लक्ष केंद्रित करण्याचे निर्देशही त्यांनी बँकांना दिले.

आरबीआय निर्देश

व्यक्ति ते व्यक्ती आर्थिक व्यवहारातील गैरप्रकार रोखून गुंतवणुकदारांचं हित जपण्यासाठी रिझर्व बँकेनं नव्या मार्गदर्शक सूचना काल तत्काळ प्रभावानं जाहीर केल्या. पारंपरिक बँकींग पद्धतीला फाटा देऊन पी टू पी माध्यमांमुळे धनको आणि ऋणको थेट एकमेकांच्या संपर्कात येतात. यामध्ये वाढीव कर्ज पुरवठा किंवा हमी देताना निर्माण होणारी जोखीम गृहित धरुन अशा पुरवठादारांवर विमा उत्पादनांची विक्री करण्याबाबत आता निर्बंध घातले आहेत. व्यवहारांमध्ये मुद्दल, व्याज किंवा दोन्हींचे नुकसान झाल्यास ते धनकोने भरुन द्यावं लागेल असं नव्या निर्देशांमध्ये म्हटलं आहे.

पोलंड युक्रेन दौरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्यापासून पोलंड आणि युक्रेनच्या तीन दिवसीय दौऱ्यावर असतील. नवी दिल्लीत काल झालेल्या पत्रकार परिषदेत परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव तन्मय लाल यांनी ही माहिती दिली. 45 वर्षांनंतर भारतीय पंतप्रधान पोलंडला भेट देणार असल्यानं हा दौरा महत्त्वाचा असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे. पंतप्रधान मोदी पोलंडचे पंतप्रधान डोनाल्ड टस्क यांच्याशी संवाद साधतील, तसंच राष्ट्राध्यक्ष आंद्रे डुडा यांच्याशीही चर्चा करतील. पंतप्रधान पुढे वर्सो भागातल्या भारतीयांची भेट घेतील. पुढे ते 23 ऑगस्टला युक्रेनकडे रवाना होतील. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोडिमीर झेलेन्स्की यांच्या निमंत्रणानुसार, ते युक्रेनला भेट देतील. दोन्ही नेत्यांमध्ये यावेळी उच्चस्तरीय चर्चा होईल. रशिया युक्रेन युद्धाप्रकऱणी शांततापूर्ण उपाय सुचवण्यासाठी भारत आवश्यक ते योगदान आणि शक्य तेवढा पाठिंबा देईल, असंही लाल यांनी सांगितलं.

कोलकत्ता हत्या प्रकरण

पश्चिम बंगाल सरकारने आर जे कार वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातल्या आर्थिक गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी पोलिस महानिरीक्षक प्रनब कुमार यांच्या अध्यक्षतेखाली चार सदस्यीय विशेष तपास पथक तयार केलं आहे. 2021 पासूनच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी केली जाणार असून एका महिन्यात हे पथक आपला अहवाल सादर करेल. कोलकत्यातल्या सागोर दत्त वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय तसंच कॉलेज ऑफ मेडिसीनमधल्या परिचारिकांनी काल या प्रकरणी निषेध फेरीत सहभाग घेत पीडितेला न्याय देण्याची मागणी केली. रुग्णालयाच्या आवारात या परिचारिकांनी आपला निषेध व्यक्त केला असून या प्रकरणी आंदोलन करणाऱ्या काही डॉक्टरांनीही यात सहभाग नोंदवला. दरम्यान, या अत्याचार आणि हत्या प्रकरणातली चुकीची माहिती आणि पीडितेचं नाव समाज माध्यमांवर प्रसिद्ध केल्याप्रकरणी कोलकत्ता पोलिसांनी शहरातल्या दोन प्रतिष्ठित डॉक्टरांना समन्स बजावलं आहे. या विरोधात वैद्यकीय क्षेत्रातील अनेकजण रस्त्यावर उतरले आहे. हे दोन्ही डॉक्टर पोलिस चौकशीसाठी जात असताना शेकडो विद्यार्थी व डॉक्टर्स समर्थनार्थ त्यांच्यासोबत चालत होते.

बीएमसी डॉक्टर संप

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवासी डॉक्टरांनी सुरक्षेत वाढ आणि केंद्रीय आरोग्य सेवा संरक्षण कायद्याची अंमलबजावणी अशा विविध मागण्यांसाठी संप पुकारला आहे. महिला आरोग्यसेवकांना सुरक्षित वातावरण देण्याच्या मागणीसाठी या डॉक्टरांनी काल आझाद मैदान इथं मूक मोर्चा काढला. मुंबईतल्या सायन रुग्णालयात मद्यपान केलेला रुग्ण आणि त्याच्या नातेवाईकांना निवासी महिला डॉक्टरशी छेडछाड केल्यानं हा संप पुकारण्यात आला असून याप्रकणी एफआयआर दाखल करण्यात आली आहे.

या छेडछाडीप्रकरणी रुग्णालयाकडून कठोर कारवाई होईपर्यंत हा संप सुरू राहणार असून आपत्कालिन सेवा मात्र सुरू राहणार आहेत.

राष्ट्रपती रक्षाबंधन

देशभरातल्या विविध शाळांमधल्या विद्यार्थ्यांसोबत राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी काल राखीपौर्णिमेचा सण साजरा केला. 16 राज्यांमध्ये विविध सरकारी शाळांमधल्या 180 विद्यार्थ्यांनी राष्ट्रपतींची भेट घेतल्याची  माहिती शिक्षण मंत्रालयाने दिली आहे. या विद्यार्थ्यांना अमृत उद्यानाची सफर घडवून आणल्याची माहितीही मंत्रालयाने दिली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्याबद्दल आणि आशीर्वाद दिल्याबद्दल केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राष्ट्रपती मूर्मू यांचे आभार मानले.

जम्मू काश्मीर दहशतवादी हल्ला

जम्मू काश्मिरच्या उधमपूर जिल्ह्यात केंद्रीय राखीव पोलिस बलाच्या जवानांच्या तुकडीवर काल दुपारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात एका जवानाचा मृत्यू झाला. रामनगर भागातल्या चीलमध्ये सीआरपीएफ १८७ बटालियनवर दहशतवाद्यांनी गोळ्यांच्या ३० ते ४० फैरी झाडल्या. परिसराची नाकेबंदी करण्यात आली असून दहशतवाद्यांना पकडण्यासाठी मोठ्या प्रमाणावर शोधमोहीम राबवली जात आहे.

गाझायुद्धबंदी
अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री अँटनी ब्लिंकन यांच्याशी जेरुसलेम इथं तीन तास चर्चा केल्यानंतर इस्रायलचे पंतप्रधान बेंजामीन नेतान्याहू यांनी हमासनं ओलिस ठेवलेल्या इस्रायलींच्या सुटकेबाबत  मध्यस्थी करण्याचा अमेरिकेचा प्रस्ताव मान्य केला. इस्रायलच्या सुरक्षेच्या गरजा लक्षात घेऊन ओलिसांच्या सुटकेसाठी मध्यस्थी करण्याच्या अमेरिकेच्या प्रस्तावाशी इस्रायल वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार नेतान्याहू यांच्या कार्यालयानं प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात केला. नेतान्याहू यांनी अमेरिकेच्या प्रस्तावाला पहिल्यांदाच जाहीररीत्या दुजोरा दिला असल्याचं निवेदनात नमूद केलं आहे. नेतान्याहू यांनी अत्यंत रचनात्मक पद्धतीनं हा प्रस्ताव मान्य केल्याचं ब्लिंकन यांनी सांगितलं.

पाऊस अंदाज
येत्या चार दिवसात देशाच्या पूर्व,पश्चिम, वायव्य भागात तसंच मध्य भारतात मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे. याशिवाय दक्षिणेकडील द्विपकल्प भागातही उद्यापर्यंत मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.  तसंच जम्मू, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, उत्तर प्रदेशातही येत्या 23 तारखेपर्यंत जोरदार पावसाची शक्यता असल्याचं हवामान खात्यानं म्हटलं आहे.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.